# BDC LIBRARY

New Paper Clipping

A.Y. 2024-2025

# इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटणच्या विद्यार्थ्यांचे यश

**पाटण,** दि. ११ : कोयना एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी घेतलेल्या अभ्यासक्रमाच्यां वार्षिक परीक्षेत यश मिळवले.

एप्रिल २०२४ मध्ये घेतलेल्या डिप्लोमा इन केटरिंग अँड रेस्टॉरंट मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत भावना सूर्यवंशीने ८४.८९ टक्के गुण मिळवून सातारा विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. धनराज देसाई याने ८३.७८ टक्के गुण मिळवून द्वितीय, विक्रम पवार व योगेश सपकाळ यांनी ८१.७८ टक्के गुण मिळवले आहेत. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, पाटण डिप्लोमा अभ्यासक्रमाची ही पहिलीच बॅच असून इतर वर्षीच्या अभ्यास-क्रमाप्रमाणेच या विद्यार्थ्यांनीही कॉलेजचा निकाल शंभर टक्के लावण्याची परंपरा कायम राखली. त्याचबरोबर सातारा जिल्ह्यातून प्रथम येण्याचे श्रेय मिळवले आहे. सर्व विद्यार्थ्यांची कॉलेज कॅम्पसमधून निवड होवून पाच विद्यार्थी स्टार हॉटेल्समध्ये ट्रेनिंग करत आहेत.

या यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य चेतन सावंत, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर सपकाळ, प्रा. भरत कांबळे यांनी अभिनंदन केले.